दै. सत्यप्रभा दि. 12/08/2024

## दुचाकी चोरी प्रकरणातील आरोपीस अटक

# स्कुटी, खंजीर, १६ मोबाईल जप्त



**नांदेड दि. ११ :** दुचाकी चोरी प्रकरणातील एका आरोपीस अटक करीत स्कुटी, खंजीर, १६ मोबाईल असा २ लाख ६३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

शहरातील वजीराबाद पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक आर.डी वटाने, पोलीस अंमलदार दत्तराम जाधव, पोलीस जमादार विजयकुमार नंदे, पोलीस जमादार मनोज परदेशी, पोलीस नाईक शरदचंद्र चावरे, पोलीस अंमलदार बालाजी कदम, पोलीस अंमलदार रमेश सूर्यवंशी, पोलीस अंमलदार इम्रान शेख, पोलीस अंमलदार भाऊसाहेब राठोड, पोलीस अंमलदार अंकुश पवार हे पेट्रोलींग करीत असतांना मिळालेल्या गुप्त माहिती आधारे उर्वशी घाट महादेव मंदीर समोर धाड टाकीत आरोपी किरण ऊर्फ छोट्या विश्वास तुळशे यास ताब्यात घेतले आहे.

पोलीस चौकशीत सदर आरोपीची अंगझडती घेतली असता त्याच्या ताब्यामध्ये एक खंजीर मिळुन आला तसेच त्याचे ताब्यात एक पांढऱ्या रंगाची होन्डा ॲक्टीवा गाडी व सदर गाडीच्या डीकीत संशयितरित्या एकुण १६ मोबाईल फोन आढळून आले आहेत. आरोपीने मोबाईल चोरीची कबुली दिली असून त्याच्या कडील स्कुटी, खंजीर, १६ मोबाईल जप्त करण्यात आले आहे.

याप्रकरणी पोलीस अंमलदार मनोज परदेशी यांनी दिलेल्या तक्रारी आधारे वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला, सदर आरोपीने नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतून स्कुटी चोरल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले असून चोरलेल्या उर्वरीत मोबाईल फोनचा शोध पोलीस घेत आहेत.